**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जांसंदर्भात अकिफायतशीर पत्रव्यवहार टाळून विहीत मुदतीत अर्ज निकालात काढणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००८/प्र.क्र. ९३/०८/सहा (मा.अ.)**

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ६ सप्टेंबर, २००८

**परिपत्रक :-**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती अधिकाऱ्यांनी ३० दिवसात अर्जदारास माहिती पुरविणे आवश्यक आहे. अर्जदारास माहिती पुरविण्यासाठी जादा शुल्काची आवश्यकता असल्यास माहिती अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ मध्ये विहित केलेल्या दराप्रमाणे सदर शुल्क परिगणित करुन अर्जदारास कळविणे व कळविलेले शुल्क प्राप्त झाल्यानंतर अर्जदारास तात्काळ माहिती पुरविणे आवश्यक आहे. मात्र अशी कार्यवाही करताना रुपये २/-, ३/-, ४/- अशा किरकोळ जादा शुल्काकरिताही माहिती अधिकाऱ्यांकडून अर्जदारांना पत्रं पाठविण्यात येत असल्याचे तसेच काही प्रकरणी पोस्टाने माहिती हवी असल्यास टपालाची तिकीटे लावलेले लिफाफे अर्जदारांकडून मागविण्यात येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. अर्जदारांकडून जादा शुल्क घेऊन माहिती पुरविण्याची कृती तांत्रिकदृष्ट्या व कायदेशीरदृष्ट्या योग्य असली तरी असे किरकोळ जादा शुल्क भरण्याचे कळविण्यासाठी माहिती अधिकाऱ्यांकडून पत्रव्यवहार होतो व अर्जदारांकडून असे शुल्क प्रदान केल्यानंतर प्रत्यक्षात माहिती पाठविण्यासाठी पुन्हा **पोस्टाचा दाखला घेऊन (अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने)** पत्रव्यवहार करणे भाग पडते. अशा कार्यवाहीत खर्ची पडणारे मनुष्यबळ, स्टेशनरी, कार्यालयीन वेळ तसेच टपाल खर्च इ. विचारात घेता अशा किरकोळ रकमेच्या मागणीपेक्षा प्रथम पत्रातच संबंधितांना माहिती पुरविल्यास ते आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ठरेलच शिवाय प्रशासकीयदृष्ट्याही ते अधिक सोयीचे व मर्यादित मनुष्यबळ व संसाधनांवरील ताण टाळणारे ठरु शकेल. तसेच सामान्य अर्जदारांसही त्यास हवी असणारी माहिती विनाविलंब पुरविण्याचा हेतू साध्य होईल. तरी वरील पार्श्वभूमी विचारात घेऊन, जेथे अत्यंत किरकोळ जादा शुल्क आवश्यक आहे अशा अर्जांवर वरील तर्कसंगती वापरुन राज्य जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रकरणपरत्वे उचित निर्णय घ्यावा. पुढे असेही स्पष्ट करण्यात येते की, जेथे अर्जदारास माहिती पाठविण्यासाठी अधिनियमातील कलम ७(१) मधील जादा शुल्क मागविण्याची आवश्यकता नसून पहिल्याच पत्रोत्तरात माहिती पाठविणे शक्य आहे व त्यासाठी साधारण टपाल हशीलापेक्षा अधिक टपाल हशील लागत नाही तेथे सदर टपाल हशीलाचा खर्च अर्जदारांकडून घेणे योग्य नाही.

२. याव्यतिरिक्त असेही स्पष्ट करण्यात येत की, माहिती अधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेल्या अर्जातील माहिती किंवा माहितीचा भाग अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असेल तर तो अर्ज, माहिती अधिकाऱ्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३) अन्वये कोणत्याही परिस्थितीत ५ दिवसांत त्या संबंधित प्राधिकरणाकडे

कृ.मा.प.

हस्तांतरित करावा व अर्जदारास तत्संबंधी सूचना द्यावी. कलम ६(३) मध्ये **अन्य प्राधिकरण (Another Public Authority)** या बाबत असणारा उल्लेख **एकवचनी** आहे. जेथे अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित असेल, तेथे अशा एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणांकडे अर्जाच्या प्रती हस्तांतरित करणे आवश्यक नाही. अशा प्रकरणी ज्या माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झालेला आहे, त्यांने स्वतःच्या प्राधिकरणाशी संबंधित माहिती पुरवून अर्जदारास इतर मुद्यांसंदर्भात संबंधित प्राधिकरणांकडे वेगळे अर्ज करण्याचे सुचवावे, अशा आशयाचे मार्गदर्शन केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल, पब्लिक ग्रिव्हन्सेस अॅन्ड पेन्शन्स, डिर्पाटमेंट ऑफ पर्सोनेल अॅन्ड ट्रेनिंग यांच्या कार्यालयीन ज्ञापन क्रमांक- १०/२/२००८-आयआर, दिनांक १२/६/२००८ अन्वये प्रसृत करण्यात आले आहे.

या व्यतिरिक्त या अधिनियमा अंतर्गत माहिती पुरविताना, सार्वजनिक प्राधिकरणांकडे कलम २ (च) मध्ये व्याख्या केलेली व उपलब्ध असलेली माहितीच् पुरविणे अभिप्रेत असून जेथे वेगळयाने माहितीचे संकलन, संशोधन, पृथःकरण करणे आवश्यक आहे अशा स्वरुपातील माहिती पुरविणे अभिप्रेत नाही.

३. अर्ज करतांना तसेच जादा शुल्काचे प्रदान करतांना रोख रकमेव्यतिरिक्त दर्शनी धनाकर्ष, बँकेचा धनादेश तसेच मनीऑर्डर इ. मार्गांनी शुल्क भरण्याची सोय महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ अन्वये अर्जदारांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मात्र अनेक सार्वजनिक प्राधिकरणांकडून दर्शनी धनाकर्ष, बँकेचा धनादेश तसेच मनीऑर्डर इ. कोणाच्या नावे (In favour of....) काढण्यात यावे, यास प्रसिध्दी दिल्या जात नाही. त्यामुळे वेगळयाच आदात्याच्या (Payee) नावें पाठविलेले शुल्क शासन तिजोरीत जमा करणे कठीण होते व अनावश्यक पत्रव्यवहार तसेच माहिती पाठविण्यास विलंब इ. प्रसंग उद्‌भवतात. तरी अर्जदाराने दर्शनी धनाकर्ष, बँकेचा धनादेश तसेच मनीऑर्डर इ. कोणाच्या नावे (In favour of....) असावेत, यास सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी नोटीस बोर्ड तसेच वेबसाईटवरुन व्यापक प्रसिध्दी दयावी.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर संगणक सांकेतांक क्र. २००८०९०६१४२७३६००१ वर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**विलास थोरात**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,

- प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
- प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
- सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

कृपु.प.

- प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
  मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
  मा. मुख्यमंत्री /मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव
  मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
  मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
  मुख्य सचिवांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
  सर्व मंत्रालयीन विभाग,
  सर्व विभागीय आयुक्त,
  सर्व जिल्हाधिकारी,
  सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
  सर्व मंडळे / महामंडळे व शासनाचे सर्व सार्वजनिक उपक्रम
  सर्व महानगर पालिका / नगरपालिका / नगर परिषदा
  निवड नस्ती, सा.प्र.वि., कार्यासन क्र. ६.
- पत्राने